# नमुना उत्तरपत्रिका

प्रश्न १. 'वाडवळी' बोलीभाषेचे विशेष सांगून उच्चारप्रक्रियेची सविस्तर चर्चा करा.

उत्तर–'वाडवळी' –वाडवळ हे व्यवसायवाचक नाम–वाडवळी बोलीवर गुजराथी, मारवाडी या बोलींचा तसेच ख्रिस्ती वाडवळी बोलीवर पोर्तुगीज आणि कोंकणी भाषांचा प्रभाव, परकीय भाषांचा प्रभाव, यादवकालीन मराठी शब्दांचा अंतर्भाव, प्रभावक्षेत्रातील छटा, बोलीतील अंगभूत लय, स्वाभाविक सौंदर्य, उच्चारप्रक्रियेत 'ळ' चा 'ड', 'स' चा 'ह', 'ह','झ' ऐवजी य , 'अ' चा 'व', 'च' चा 'स' होतो... यास्वरूपाचे विवेचन अपेक्षित.

**किंवा**

प्रश्न १. 'वाडवळी' साहित्याच्या इतिहासाचा आढावा घ्या.

उत्तर–वाडवळी समाजाच्या मौखिक आणि लिखित साहित्यातून वाडवळी साहित्याचा इतिहासाची चर्चा आवश्यक. इंग्रजी धर्मोपदेशकांनी मराठी भाषा आत्मसात करून लेखन, संशोधन केले – पोर्तुगीजकाळात काही रचना– मधल्या काळात लेखनाची परंपरा खंडित– त्यानंतर तीनशे वर्षांनी आजतागायत सुरू आहे. अशा स्वरूपाची चर्चा अभिप्रेत.

प्रश्न २. ''कोपात' या कादंबरीमधून मन्याचे भावविश्व व्यक्त झाले आहे' या विधानाची चर्चा करा.

मन्या– त्याची जडणघडण– मन्याचे कुटुंब–मन्याचे परदेशातील अनुभव, त्याचे विविध विचार या सर्वांमधून चित्रित झालेले मन्याचे भावविश्व या बाबींची चर्चा अपेक्षित.

**किंवा**

प्रश्न २. 'कोपात' या कादंबरीच्या आधारे वसईतील बदलत्या समाजजीवनचा परिचय करून द्या.

उत्तर–वसई वसईचा ख्रिस्ती समाज, संस्कृती भाषा यातील परिवर्तन सांगताना धर्म, भाषा, सहजीवन वसई परिसर, जुन्या वसई गावाची मानसिकता, काळवंडणारे वर्तमान, परागंदा होऊ लागलेली माणूसकी, महानगर बनताना नष्ट होऊ लागलेली संवेदनशीलता यांसारख्या बाबींमधून वसईच्या ख्रिस्ती समाजाच्या अंतर्बाह्य परिवर्तनाची चर्चा अभिप्रेत.

प्रश्न ३. तुम्हांस अभ्यासास लावलेल्या कथांच्या आधारे वाडवळी बोलीचे विशेष सांगा.

अभ्यासास असलेल्या कथा–कथालेखक– कथेतील बोली–कथेतून आलेल्या गुजराथी, मारवाडी या बोलींचा तसेच ख्रिस्ती वाडवळी बोलीवर पोर्तुगीज आणि कोंकणी भाषांचा प्रभाव, परकीय भाषांचा प्रभाव, यादवकालीन मराठी शब्दांचा अंतर्भाव, बोलीतील अंगभूत लय, स्वाभाविक सौंदर्य यासंदर्भातील विवेचन अपेक्षित.

**किंवा**

प्रश्न ३. तुम्हांस अभ्यासास लावलेल्या वाडवळी कवितांचे वेगळेपण सांगा.

उत्तर–उच्चारप्रक्रिया, उच्चारसौकर्यता, मिथकांचा अंतर्भाव, परभाषेतील शब्द, परकीय पदार्थवाचक शब्दांचा अंतर्भाव यांसारखे विशेष अपेक्षित.

**प्रश्न ४. टिपा लिहा**.

१.वाडवळी बोलीतील म्हणी

उत्तर– वाडवळी बोलीतील कोणत्याही दहा म्हणी अर्थासह सांगणे अपेक्षित.

**किंवा**

१.वाडवळी लोकसंस्कृती

उत्तर– ख्रिस्ती धर्माशी संबंधित शब्दांचा पगडा, वाडवळी बोलीचे वेगळेपण, ख्रिस्ती समाजातील विविध बाबींचा प्रभाव, विविध पदार्थांचा वेगळेपणा, यांसह लोकसंस्कृतीच्या अनुषंगाने येणाऱ्या बाबींचे विवेचन अपेक्षित

२. 'कोपात'मधील कोपात

उत्तर–'कोपात'चा अर्थ – स्थान–त्याची कर्तव्ये– कोपातचे बदलते स्वरूप

**किंवा**

२. मन्याची परदेशवारी

उत्तर– मन्या– पहिला परदेश प्रवास –तेथील वास्तव मृगजळाप्रमाणे–दुसऱ्यावेळीचा परदेशप्रवास...

३. 'माणूसकीहा साक्षात्कार' या कथेतील माणूसकी'

उत्तर– आशयाच्या अनुषंगाने माणूसकीचे विवेचन अभिप्रेत

**किंवा**

३. 'जमीन' कवितेचे विशेष

उत्तर– सामाजिक, भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक विशेष या अनुषंगाने विशेष अपेक्षित.

**प्रश्न ५. खाली दिलेल्या प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही पाच)**

०१. वाडवळी बोलीतील कोणत्याही दोन म्हणी त्यांच्या अर्थासह सांगा.

उत्तर – वाडवळी बोलीतील कोणत्याही अर्थासह दिलेल्या दोन म्हणींना पूर्ण गुण द्यावे.

०२. कॅथेलिक ख्रिस्ती समाजावर कोणकोणत्या परकीय भाषांचा संस्कार आहे?

उत्तर – कॅथेलिक ख्रिस्ती समाजावर पोर्तुगीज, लॅटिन, हिब्रू, फारसी या परकीय भाषांचा संस्कार आहे

०३.'बोटभर काकडी न हातभर बी' या म्हणीचा अर्थ सांगा.

उत्तर – 'बोटभर काकडी न हातभर बी' या म्हणीचा अर्थ एखाद्या वस्तूचा बडेजाव करणे असा होतो.

०४.'हरळ' म्हणजे काय?

उत्तर – 'हरळ' म्हणजे विडयाच्या पानाची वेल जमिनीलगत लावण्यासाठी खणलेला खड्डा.

०५. पोर्तुगीज पाकशास्त्रातील मासांहाराचे कोणतेही पाच प्रकार सांगा.

उत्तर – पोर्तुगीज पाकशास्त्रातील मासांहाराचे कोणतेही पाच प्रकार–इंदियाल, सर्पोतेल, सापूती, टेपरात, मोईल.

०६. कोणत्या संस्कारामुळे कॅथेलिक कुटुंबातील बाळ कॅथेलिक पंथाचे सभासद बनते?

उत्तर – बाळ एक दोन महिन्याचे असताना केलेल्या 'बाप्तिस्मा' या संस्कारामुळे कॅथेलिक कुटुंबातील बाळ कॅथेलिक पंथाचे सभासद बनते.

०७. 'माणुसकीहा साक्षात्कार' या कथेच्या अनुवादकाचे नाव सांगा.

उत्तर – 'माणुसकीहा साक्षात्कार' या कथेच्या अनुवादकाचे नाव नूतन पाटील.

०८.'गुलाबाशा फुला'या लोकगीतामध्ये कोणी कोणाला आळविले आहे?

उत्तर – 'गुलाबाशा फुला'या लोकगीतामध्ये प्रेमळ पत्नीने आपल्या प्रिय पतीला आळविले आहे.

०९. डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांच्या वाडवळी कवितांची नावे सांगा

उत्तर – डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांच्या वाडवळी कवितांची नावे– 'तुया गावात', 'समजावणी' अशी आहेत.